**प्रेसनोट** दिनांक ०२/०४/२०२५

**शहर वाहतूक उपशाखा कल्याण, ठाणे शहर येथील वाहतूक वॉर्डन वैभव युवराज शिरसाट, (इतर लोकसेवक )यांना सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | ठाणे |
| **स्टेशन डायरीनोंद क्र.** | महात्मा पोलीस स्टेशन, ठाणे शहर. स्टेशन डायरी नोंद क्र.५३/२०२५ वेळ २०.४६वा. |
| **इतर लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | वैभव युवराज शिरसाट, वाहतूक वॉर्डन,<br>नेमणुक– शहर वाहतुक उपशाखा कल्याण, ठाणे शहर. |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ३,०००/–रूपये |
| **तडजोडीअंती स्वीकारलेल्या लाचेची रक्कम** | २,०००/–रूपये |
| **थोडक्यात हकीकत** | यातील तक्रारदार यांची दुचाकी ही कल्याण येथील वाहतूक पोलीस यांनी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी कल्याण रेल्वे स्टेशन येथून ताब्यात घेवून ती वाहतूक विभागा मध्ये जमा केली होती, ती सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस यांनी तक्रारदार यांचे कडे तीन हजार रुपयांची लाच मागीतली आहे. नमुद आशयाची तक्रार तक्रारदार यांनी दि. ०२/०४/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०२/०४/२०२५ रोजी पडताळणी केली असता इतर लोकसेवक वैभव युवराज शिरसाट, वाहतूक वॉर्डन, नेम. कल्याण वाहतूक विभाग, वय २६ वर्षे, यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती २,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाप्रवि ठाणे यांनी दिनांक ०२/०४/२०२५ रोजी सापळा कारवाई चे आयोजन करून इ.लो.से., वैभव युवराज शिरसाट वाहतूक वॉर्डन यांना तक्रारदार यांच्याकडुन शहर वाहतूक उप शाखा, कल्याण च्या बाहेर सार्वजनिक रस्त्यावर २,०००/– रुपये लाच स्विकारल्यावर रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद इतर लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्कपत्ता :–ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम ४००६०१
सकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane @mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोलफ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्स ॲप नं :– ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे

( राजेश जांगडे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.